उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिकांचे मासिक

# बृहन्महाराष्ट्रवृत्त

वर्ष पहिले अंक सातवा

जुलै १९८१

BRAHAN-MAHARASHTRA MANDAL
P.O.BOX 94156
SCHAUMBERG, ILL. 60194

BULK RATE
U.S. POSTAGE PAID
SCHAUMBERG, ILL 60194
PERMIT NO. 329

RETURN POSTAGE GUARANTEED

काही वाचकांनी दिलेल्या आर्थिक सहाय्याने व उत्तेजनामुळे आमच्या प्रयत्नाला यश येऊ पहात आहे. परंतु आम्हाला खात्रीपूर्वक समजते की अद्यापि कितीतरी वाचकांना मदत करण्याची इच्छा आहे, त्यांना दरमहा मिळणारे वृत्तपत्रही पसंत आहे पण त्यांच्याकडून काही कारणाने मदत पाठवणे किंवा मत कळविणेहि घडलेले नाही. त्या सर्वांना पुन्हा एकदा सांगावेसे वाटते की आपल्या भरीव प्रतिसादावर या प्रयत्नांचे स्थैर्य अवलंबून असल्याने त्वरित अभिप्रायाची अपेक्षा आहे;

मनांतले भाव, कृतीत उतरावे
एकतेचे बीज नित फोफावे!

जयश्री दुर्वेकर

## आहिरातींसाठी

बृहन्महाराष्ट्रवृत्तासाठी व्यापारी आणि व्यक्तिगत आहिराती स्विकारण्यात येतील.

आहिरातींचे दर पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| संपूर्ण पृष्ठ | ५० डॉलर्स |
| १/२ पृष्ठ | ३० डॉलर्स |
| १/४ पृष्ठ | २० डॉलर्स |
| १/८ पृष्ठ | १२ डॉलर्स |

व्यक्तिगत आहिरातीस ५ डॉलर्स पडतील.

पत्रव्यवहाराचा पत्ता: MR. VISHNU VAIDYA
3209 KNOLLWOOD LANE
HOMEWOOD, ILL 60430
PHONE: (312) 798-4984 EVES & WEEKENDS
(312) 281-5335 DAYS.

## आर्थिक मदतीविषयी:

बृहन्महाराष्ट्रवृत्ताला आम्ही वर्गणी ठरविलेली नाही. संकलन छपाई आणि टपालखर्च विचारात घेता सध्या प्रसिद्ध होणाऱ्या अंकाला प्रत्येकी दरमहा $0.50 खर्च येतो. पृष्ठसंख्या वाढल्यास हा खर्च आणखीच वाढेल. आहिराती व वाचकांकडून येणाऱ्या देणग्या शिवाय हे वृत्तपत्र आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होईल. आपण दिलेल्या देणगीवर आपणास Tax deduction घेता येईल. तरी आपणास शक्य असेल त्या रकमेचा चेक खालील पत्त्यावर पाठवावा, ही विनंति आहे.

## महत्वाची जाणीव:

बृहन्महाराष्ट्रवृत्त आम्ही BULK RATE ने पाठवण्यास सुरुवात केली आहे. आपणास अंक न मिळाल्यास त्वरित कळविल्यास दुसरी प्रत पाठवली जाईल. 'आहिरातींसाठी' तील फोन नंबर वापरावेत. तसेच वाचकांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने ओळीने तीन अंक आपल्या अभिप्रायासाठी पाठवले जातील त्यानंतर आपल्याकडून काहीहि प्रतिसाद न मिळाल्यास आपले नाव वगळून दुसऱ्यांना संधी देण्यात येईल, याची कृपया जाणीव ठेवावी.

पंचांग : जुलै २० , संकष्टी चतुर्थी, चंद्रोदय ९-५२
जुलै २९ , शिवरात्री , श्रीनामदेवमहाराज पुण्यतिथी
जुलै ३१ , सूर्यग्रहण
ऑगस्ट ४ , नागपंचमी श्रावण शु. ५
ऑगस्ट १४ , नारळीपौर्णिमा , रक्षाबंधन १०.३५ नंतर
ऑगस्ट १८ , अंगारक चतुर्थी चंद्रोदय ९-१४
ऑगस्ट २३ , श्रीकृष्णजयंती
ऑगस्ट २३ , जन्माष्टमी , गोपाळकाला
सप्टेंबर १ , हरतालिका
सप्टेंबर २ , श्रीगणेशचतुर्थी

नवीन वाचकांसाठी: आपल्याला अंक नियमित हवा असेल तर खालील माहितीपत्रक भरून पाठवावे.

NAME :                DONATION : YES ___ $
                                   NO ___
ADDRESS :

PHONE :

पत्ता : BRIHAN MAHARASHTRA MANDAL, P.O. BOX NO 94156 SCHAUMBURG, ILL. 60194.

बृहन्महाराष्ट्र वृत्त दर महिन्याच्या पंधरा तारखेस प्रसिद्ध करण्यात येते.

# ठळक बातम्या

**भारत-चीन वाटाघाटी :** चीनचे परराष्ट्रमंत्री श्री. हुआंग हुआ यांनी सूनअखेर भारताला भेट दिली. द्विपक्षीय संबंध बळकट होण्याच्या दृष्टीने या भेटीचा उपयोग होणार असला तरी गेली तीस वर्षे रखडत असलेला भारत-चीन सीमा प्रश्न अनिर्णितच राहिला. येत्या ऑक्टोबरमध्ये पुन्हा भारत-चीन वाटाघाटी होणार असून त्यावेळी सीमाप्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल असे परराष्ट्रमंत्र्यांनी सुचविले.

**यशवंत-प्रवेश लांबणीवर :** इं. कॉं. कार्यकारिणी प्रवेशाबाबत काही निकष निश्चित करणार असून नंतर निर्णय घेणार आहे. प्रवेशद्वारीच आलेल्या मानभंगाचा विषय सर्वपक्षीय लोक आपापल्या पद्धतीने चघळत होते. महाराष्ट्रात शालिनीताई पाटील, मुलखराव पाटील शरद पवारांवर त्यांच्या पुढच्या भवितव्याच्या दृष्टीने तुटून पडले होते. शरद पवारांना आधुनिक सूर्याजी पिसाळ ठरवून शहाजी व्हायचे की शिवाजी या वादाचे उत्तर जनता देईल असे मत नाईकसाहेबांनी व्यक्त केले. तर अर्स काँग्रेसच्या आमदारांनी राजीनामा दिला असेल त्या सर्वांना इं.कॉं.मध्ये प्रवेश मिळेल असे मुख्यमंत्री अंतुले यांनी प्रतिपादन केले. याची प्रतिक्रिया म्हणून श्री. चव्हाण मानभंग वगैरे न मानता निर्णयाची वाट पहात बसले आहेत. त्यावर 'चिकटाई, चिकटाई हार जाइ' असे म्हणत वाटमाज यशवंतरावजी घराच्या दर्शात, ति अंगून 'अंबाई, मी माझ्या राजीवबाळाला भेट लावते' असं इंदिराजी सुनावताहेत असे यथार्थ चित्र व्यंगचित्रकाराने चितारले आहे.

**आसामातील तैमूर सरकार गडगडले :** गेले केवळ सहा महिने सत्तेवर असलेले आसामच्या मुख्यमंत्री अन्वरा तैमूर यांच्या अल्पमतातील मंत्रिमंडळाने राजीनामा दिला आहे. दरम्यान सात विरोधी पक्षनेत्यांनी आपण शासन बनवू शकतो असा दावा केला असला तरी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत राज्यपालांनी श्रीमती तैमूर यांना काम पहाण्यास सांगितले आहे.

**राजीव गांधी विजयी :** अमेठीमधून श्री. गांधी २३६०० इतक्या मताधिक्याने विजयी झाले असून पोटनिवडणुकीत इं.कॉं.ने नेत्रदीपक यश मिळविले.

**राष्ट्रीय सुरक्षा कायद्याला श्रमिक मुंबईचे आव्हान :** काही दिवसांपासून शांततेला बाधा आणणाऱ्या डॉ. दत्ता सामंत यांच्या कृत्यांवर शासकीय यंत्रणेने लक्ष ठेवले होते. त्यामुळे शिवाजीपार्कवर आयोजित केलेला सामंत-प्रणीत मेळावा असफल ठरला आणि सामंतांसह सुमारे २००० लोकांना अटक करण्यात आली. दादर स्टेशनाबाहेर तर पोलिसांनी नाकेबंदी केली होती. महाराष्ट्रात इतरत्र धरपकड केली गेली. या प्रसंगानंतर कामगारनेते श्री. जॉर्ज फर्नांडिस यांनी 'सामंतांची अटक म्हणजे आणीबाणीची सलामी' असे आव्हान सत्ताधाऱ्यांना केले. आणि मजूरमंत्री शिंदे व मुख्यमंत्री अंतुले यांच्याशी त्यांनी चर्चा केली. विविध मजूर नेत्यांच्या हिंसाचाराचा पाढा वाचणारी पत्रे नरेंद्र तिडके यांनी फर्नांडिसांना दाखवली. दहशतवाद रोखण्यासाठी केलेली सामंत-स्थानबद्धता दूर करण्याची शिष्टाई फसली. दरम्यान ठाणे जिल्हा व मुंबईत ८०-१०० कारखान्यात कामगारांनी सामंतांची सुटका होईपर्यंत बैठा संप जाहिर केले. परंतु स्वतः सामंतांनी संप मागे घेण्याची सूचना केल्यावर संप संपला. डाव्या कामगार नेत्यांनी मुसळधार पावसात शिवतीर्थावर दणदणीत जाहिर सभा घेऊन कामगारएकजूटीचे दर्शन घडविले. त्या मेळाव्याला 'सुरक्षा कायदा' न वापरण्याचा दिलेला शब्द मुख्यमंत्र्यांनीही पाळला. डॉ. सामंतांच्या अटकेबाबत मुख्यमंत्री अंतुले यांनी 'डॉ. सामंतांना कामगार नेते म्हणून अटक केली नसून त्यांच्या दहशतवादी कारवायांच्या संदर्भात त्यांना पकडण्यात आले आहे' असे स्पष्टीकरण दिले व त्याबाबतीत श्रीमती गांधींचा कालबद्ध व कलमवार कार्यक्रम राबविण्यात येईल हा निर्धार व्यक्त केला.

**कापूस खरेदी योजना मोडीत :** महाराष्ट्र शासनाने प्रतिष्ठेची मानलेली एकाधिकार कापूस खरेदी योजना मुदतवाढ न घेतल्याने बंद पडली आहे. केंद्रसरकारचा या योजनेस ठाम विरोध आहे.

**रेल्वेच्या प्रचंड दरवाढीने यात्रा कंपन्या धोक्यात :** भारतीय रेल्वे खात्याने पूर्वसूचना न देता दरवाढ केल्याने यात्राकंपन्यांना आता सहन करावा लागला.

**कांदा खरेदी केंद्र :** मार्केटिंग फेडरेशनने विदर्भात सुरु केलेल्या अंजनगाव सुर्जी येथील एकमेव अशा कांदा खरेदी केंद्रावर हजारो रुपयांचा कांदा सडल्यामुळे फेकून द्यावा लागला, परिणामी फेडरेशनला १२५ टक्के तोटा झाला. कांदा साठवण्याची धड व्यवस्था नसतांना खरेदी केंद्र उघडून नुकसान ओढवून घेतले.

**आणखी आंदोलन ! :** अलिबागेच्या बाजारावरील मेट्याची गलबीत पद्धती नष्ट करण्यासाठी अधिक तीव्र आंदोलन करण्याची घोषणा अ. भा. मराठा महासंघाने आणि अ. भा. हिंदुमहासभेने केली आहे. शिवजयंतीस शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यास कल्याण भिवंडी भागात शासनाने बंदी केली होती तरी येत्या १५ ऑगस्टला ती मिरवणूक काढण्याचे घाटत आहे.

**कर्नाटक विधानसभेत २७ आमदार निलंबित :** सभागृहात बेशिस्त वागणूक केल्याबद्दल ही प्रतिक्रिया घडली. राज्यसरकारने काढलेले गुप्त परिपत्र प्रसिद्ध करणाऱ्या दोन वृत्तपत्रांवर खटला भरण्याच्या विचारात कर्नाटक शासन असून सरकारविरोधकांचे टपाल फोडण्याचा आदेश देण्यात आला आहे.

**कामगार सुरक्षितता परिषद :** कामगार अधिनियम शताब्दिनिमित्ताने रायगड उद्योगधंद्यातील कारखानदारांच्या वतीने महाड येथे सुरक्षितता परिषद आयोजित करण्यात आली होती. सध्या अनेक कारखान्यातून तंत्रविज्ञानाचा वाढता वापर होत आहे तेव्हा सुरक्षिततेच्या दृष्टीने सध्याच्या कायद्यात बदल होणे जरुरीचे असून उत्पादनाइतकेच मानवी सुरक्षिततेला महत्व आहे असे मत अनेक तज्ञांनी व्यक्त केले. १५० प्रतिनिधी हजर होते.

**इंडियन एअरलाइन्सच्या वाहतूक दरांत वाढ :** नजीकच्या काळात ३० टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ न केल्यास १९८७-८१ साली इंडियन एअरलाइन्सला ७ कोटींहून अधिक तोटा होईल. १९७९-८० साली ३ कोटी ३१ लक्ष रुपये तोटा आला.

**वटहुकुम :** दुकानचोर, हातभट्टीवाले आणि अन्नधान्य वा औषधे यांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायद्याखाली अटक करण्याचा अधिकार शासनाला देणारा वटहुकुम जारी करण्यात आला आहे.

**वीज दरवाढ :** १ जुलैपासून महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने २३ टक्के घरगुती वापरावर, ३२ टक्के कमर्शियल व ३५ टक्के इंडस्ट्रीयल वापरावर दर वाढविले आहेत. वीजपुरवठा करणाऱ्या छोट्या कंपन्यांवर ३८ टक्के दरवाढ करण्यात आली असून शेतकऱ्यांना मात्र या दरवाढीतून सूट देण्यात आली आहे.

**भारताला वरदान :** ऑस्ट्रेलियातील 'ल्यूकेना' या फिलीपाईन्समधून मागविलेल्या वनस्पतीचा कोसबाड कृषिसंस्थेने जोरदार प्रसार चालविला आहे. ही वनस्पती ७ वर्षांत सुमारे ५०-६० फूट उंच वाढते त्याच्या पाल्यात ३० टक्के प्रथिने असल्याने गुरांना उत्तम सकस चारा व लाकडाचा घरबांधणीस वगैरे उपयोग व्हावा अशी कल्पना आहे.

**राज्यसरकारचा ऐतिहासिक निर्णय :** मुंबई व ठाणे परिसरातील कारखाने व व्यापारी आस्थापना सिक्युरिटी गार्डसना कायदेशीर संरक्षण देणारा एक वटहुकुम महाराष्ट्र शासनाने जारी केला आहे.

**मराठवाड्यात यशस्वी रोजगार हमी योजना :** या योजनेतून ३२३८ कामांवर सुमारे १ लाख ४०८७१ मजूर काम करीत आहेत व अनेक सूविकास, पाटबंधाऱ्यांची कामे पुरी होत आहेत.

**महाराष्ट्र मंत्रिमंडळाची पुनर्रचना लांबणीवर :** अनेक दिवस बोलबोला झालेली कृति 'विस्तार करण्यास हरकत नाही मात्र सध्याच्या मंत्रिमंडळातून कुणालाही वगळता कामा नये' या दिल्लीच्या सूचनेमुळे अजूनही झालेली नाही.

**गोव्यात नवे मंत्री :** मुख्यमंत्री राणे यांनी मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्याचे ठरविल्याने त्यांचे काम सुकर व्हावे म्हणून आदेशानुसार कृषिमंत्री नागियार व कायदेमंत्री नार्वेकर यांनी राजीनामे दिले. त्यांच्याजागी डॉ. डिसोझा आणि अ. न. नायक यांची वर्णी लागली आहे.

**साखर आयातीने साखरेचे दर घसरले :** ४ लाख टन साखरेची परदेशातून आयात केल्याने साखरेचा राखीव साठा करता येईल. या कमी दरांबरोबरच गहू, तांदूळ यांचे भाव मात्र वाढले आहेत.

**मोसमी पाऊस :** राज्यात बहुतेक भागात सुरु झाल्याने शेतकरी कामास लागला आहे.

**महाराष्ट्राला आखाती पैसा :** अर्थमंत्री रामराव आदिक यांच्या नेतृत्वाखाली आखाती राष्ट्रात गेलेल्या शिष्टमंडळाच्या कामगिरीमुळे नजीकच्या भविष्यात अरबी पेट्रोडॉलर्सचा ओघ मुंबई आणि महाराष्ट्राकडे येता अशी शक्यता निर्माण झाली आहे. अनेक प्रकल्पांना आखाती पैसा मिळेल.

**धान्योत्पादन-वाढ :** १९८१-८२ वर्षासाठी महाराष्ट्र सरकारने ११३.९८ लाख मेट्रिक टन धान्योत्पादनाचे उद्दिष्ट ठेवले आहे. उत्पादनवाढीसाठी मोठ्या धरणांखालील प्रकल्पांतील उपलब्ध पाण्यापैकी ५० टक्के पाणी वापरात आणले जाईल व शक्य तिथे दोन पिके घेण्यात येतील. बियाणे, खते, जंतुनाशके आदिंच्या खरेदीसाठी बँकांमध्ये पीक-कर्ज उपलब्ध करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यात धान्य, कडधान्ये व तेलबियांसाठी प्रात्यक्षिक प्रकल्प हाती घेण्यात येतील. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या व्याजदरातही बदल करण्याचा शासनाचा विचार आहे.

**मंत्रालयासाठी प्रवेशपत्र :** प्रवेशपत्र धारकांनाच प्रवेश देण्याची पद्धत महाराष्ट्रात सुरू करण्यात आली असून प्रवेशपत्र मिळविण्यासाठी लांब रांगा मंत्रालयाबाहेर लागत आहेत. पाच ते दहा मिनिटांच्या कामासाठी दोन तास उन्हापावसातून उभे राहण्याचा नवा त्रास जनतेला सोसावा लागणार असला तरी बहुतांशी अधिकारी वर्ग या नव्या नियमाने खूष असलेला दिसतो.

**विनाकारण बेकारी :** गेले सातआठ महिने नगरच्या एस.टी. विभागातील कामगारांना बिनचौकशी सस्पेंड करण्याचा व बडतर्फ करण्याचा अन्यायकारक सपाटा सुरू असल्याचा आरोप संघटनेचे श्री. आपटे यांनी केल्यावरून स्वत: जनरल मॅनेजर याबाबतीत लक्ष घालणार आहेत.

**वैशिष्ट्यपूर्ण पूल :** धरमतर खाडीवरील २२ कोटी ७५ लाख ४५ हजार खर्चाच्या रेवस ते करंजा या पुलास महाराष्ट्र शासनाची संमती मिळाली आहे. हा पूल स्थान, बांधकाम योजना व उपयोग या सर्व दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. या पुलामुळे अलिबाग मुंबईपासून ३३ कि.मी.ने जवळ येणार आहे.

**नगर जिल्ह्यात अपुरा वीजपुरवठा :** जिल्ह्यातील ५०० शेतीपंपांना गेल्या दोन वर्षांत वारंवार मागणी करूनही विजेचा पुरवठा न झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतीवर विपरीत परिणाम झाल्याची तक्रार केली आहे. वीजपुरवठ्यासाठी शेतकरी डिपॉझिट भरण्यास तयार असूनही टाळाटाळ केली जात आहे. जर मागणीप्रमाणे वीजपुरवठा झाला तर सुमारे एक लाख हेक्टर जमिनीस पाणी मिळू शकेल.

**खास प्रशिक्षण :** अपघात टाळण्यासाठी विशेषत: पावसाळ्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसड्रायव्हर्सना खास प्रशिक्षण देण्याची योजना असून त्यानुसार पुण्यात प्रशिक्षणवर्गास सुरुवात झाली आहे.

**राजस्थानात भीषण दुष्काळ :** शेकडो जीव मैलात गवत हुडकीत पडत आहेत; अशी स्थिती निर्माण झाल्याने जनावरांना जगवावे कसे या प्रश्नाचे उत्तर शोधताना कितीतरी माणसे मृत्युमुखी पडत आहेत. जंगलतोडीला वेळीच आळा न घातल्याने अवर्षण झाले असे बोलले जाते.

**पाणीकपात :** पावसाळा लांबल्यामुळे मुंबईकरांना ठिकठिकाणी पाणीकपातीस तोंड द्यावे लागत आहे. पाणीटंचाईमुळे मलबार हिल टेलिफोन एक्सचेंज कर्मचाऱ्यांना ८-१० दिवस पाण्याशिवाय काम करावे लागले, एअरकंडिशन यंत्रणाही बंद पडली. परिणामी तेथील ११ कोटी रु.ची दूरध्वनीयंत्रणाच धोक्यात आली आहे. या ९ मजली इमारतीत हजारबाराशे लोक कामावर असून इमारतीचे बांधकाम अजूनी अपूर्ण आहे.

**लोकल प्रवाशांचे आंदोलन ? :** विरार ते डहाणू परिसरातील प्रवाशांवर पश्चिम रेल्वेकडून सुरू असलेल्या बहुविध अन्यायाला वाचा फोडण्यासाठी एक संघर्ष समिती स्थापन करण्यात आली असून तिची पहिली परिषद वसई येथे २८ जूनला वसई येथे झाली. समितीस जॉर्ज फर्नांडिस व मृणाल गोरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

**दूरध्वनी दलाल :** मुंबई टेलिफोनखात्यात बोकाळलेल्या दलालांचे कार्य निपटून काढण्यासाठी केंद्र सरकारने आखलेल्या योजनेत ग्राहकांकडून सहकार्य अपेक्षित आहे.

**पंढरपूर यात्रा:** भाविकांचा त्रास कमी करण्यासाठी महसूलखात्याने तयारी केली होती. पाऊणशे एक लांबीची शेड बांधून ऊनपावसापासून संरक्षण निर्माण केले. मंदिरासमोरील अडथळेल्या फरशा ठीक करून खाचखळगे कमी केले. कधीकधी २१ तासापर्यंत रांगेत उभे रहावे लागते त्यावेळी भाविकांना पिण्याचे पाणी व दवापाणीही उपलब्ध करून देण्यात आले. १२-१३ जुलैच्या या यात्रेच्या दिवशी शासनाच्या वतीने दि. १३ रोजी सौ. शालिनीताई पाटील महापूजा करणार आहेत.

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रकरण:** कुलाबा जिल्ह्याचे 'रायगड' आणि बोरीवलीच्या नॅशनल पार्कचे 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान' असे नामकरण झटपट झाले परंतु मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा एकमताचा विधानसभा निर्णय मात्र खुंटीला टांगून ठेवला आहे अशी टीका नामांतर कृती समितीच्या नेत्यांनी केली आहे.

**विदेशवारीचे नाव नको:** मुंबईच्या महापौरांना परदेशातील 'अग्निनगरी'चे अथवा आंतरराष्ट्रीय महापौर परिषदेचे निमंत्रण आले तर त्याचा सर्व खर्च महापालिकेने सोसला पाहिजे असे मत बहुतेक गट नेत्यांनी व्यक्त केले असले तरी महापौर डॉ. मेमन विदेश दौरा न करण्याचा निर्णय घेतला आहे.

**ठाणे जकातदर:** ठाणे नगरपालिकेने बेसुमार वाढवलेले जकातदर सामान्यतः एक कोटी रुपयांपर्यंत कमी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केले आहे.

**'मकालू' बडतर्फी:** संपकाळ प्रकरणावरून निलंबित केलेल्या पाच ज्येष्ठ अधिकाऱ्यांबाबत एअर इंडिया व्यवस्थापन दडपशाही करीत असल्याचे उच्च न्यायालयात सांगण्यात आले. या अधिकाऱ्यांच्या अर्जाबाबत निर्णय होईपर्यंत त्यांचे वेतन व भत्ते त्यांना द्यावेत असा आदेश देण्यात आला आहे.

**नवा आशावाद:** येत्या दहा वर्षांत एकही व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली राहणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रात सध्या ? कोटी जनता दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत त्यातील ४०-५० लाख शेतमजूर आहेत त्यांच्या विकासासाठी मंत्रिमंडळ स्तरावर एक समिती स्थापण्यात आली आहे.

**हुतात्मा स्मारके:** महाराष्ट्र राज्यात १०६ हुतात्मा स्मारके उभारण्यात येणार आहेत. सर्व स्मारकांचे भूमिपूजन ९ ऑगस्ट रोजी करण्याचे ठरले असून प्रत्येक स्मारकाला १.४८ लाख रुपये खर्च येणार आहे. पूर्ण स्मारकांचे उद्घाटन दि. १ मे १९८२ रोजी करण्यात येईल.

भारताच्या विकासार्थ पॅरिसमधील भारत सहाय्यता मंडळाने १९८१-८२ वर्षासाठी ३६५ कोटी डॉलर्सचे अर्थसहाय्य देण्याचे घोषित केले आहे.

**'ॲपल' भूस्थिर कक्षेत दाखल:** १९ जून रोजी 'ॲपल' उपग्रह अवकाशात सोडण्यात आला. आणि या उपग्रहाला ३६ हजार कि.मी.वरील कक्षा प्राप्त करून देण्यास भारतीय शास्त्रज्ञांना यश आले आहे. हा उपग्रह सुमात्राच्यावर (इंडोनेशिया) स्थिर होईल असा अंदाज आहे.

## दुःखद निधन:

- माजी सरन्यायाधीश प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्या ८१ व्या वर्षी निधन पावले. हे संस्कृतचे गाढे विद्वान समजले जात, त्यांना पद्मविभूषण पदवी मिळाली होती. हिंदू कायद्याचे उत्तम जाणकार समजले जात.
- भूतपूर्व केंद्रीय मंत्री आणि मुंबईचे अनभिषिक्त सम्राट स. का. पाटील यांचे मुंबईत निधन झाले.
- माजी न्यायमूर्ती भालचंद्र गोखले यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अमेरिकेत मिनियापोलिस येथे निधन झाले.
- जुन्या पिढीतील प्रख्यात नट वसंत ठेंगडी यांचे ७० व्या वर्षी निधन. '१८ वाजता' 'माझा मुलगा' 'शेजारी' 'राजा हरिश्चंद्र' 'देवघर' या चित्रपटातील त्यांच्या भूमिका गाजल्या होत्या.
- सिनेनेपथ्यकार मारोतराव मिस्त्री यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी देहावसान झाले. प्रभात, सिनेटोन, राजकमल मिनर्व्हा या प्रमुख स्टुडिओतून त्यांनी कामे केली.
- ग्रामीण कथाकार श्री. बा. भ. पाटील यांचे ६१व्या वर्षी रक्तदाबाच्या विकाराने निधन झाले. त्यांनी ५०० च्यावर कथा लिहिल्या असून '[illegible]' ला राज्य-पुरस्कार मिळाला होता.
- होळकर संस्थानचे राजकवि व होळकर दरबारी मराठीचा मान वाढविणारे रामचंद्र अनंत काळेले यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले.
- ख्यातनाम साहित्यिक दि. बा. मोकाशी यांचे ६६व्या वर्षी ल्युकेमियाच्या आजाराने निधन झाले.

**मराठवाड्यातील कारखाने** : कामगारांतील असंतोषाला कंटाळून मराठवाड्यातील अनेक नामवंत कारखाने गुंडाळले जात आहेत. आयकराबाबतीत शासकीय विशिष्ट सवलतीचा लाभ घेऊन गेल्या पंधरा वर्षांत उभारलेले हे कारखाने भरपूर नफा मिळवीत होते परंतु अलिकडील संप निटाळेबंदी प्रकरणांपासून भारत फोर्ज, सीमेन्स व अशोक लेलँडसारख्या मोठ्या कारखान्यांनी नवे प्रकल्प मराठवाड्यात सुरु करण्याचा विचार बदलून आता नाशिक, अहमदनगर परिसरात योग्य जागा शोधण्यास सुरुवात केली आहे.

**'बहुगुणी' सोया-दुधाचा कारखाना** नागपूरमधून हलविला जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. ५०० लिटर दुधासाठी २५ पोती साखर लागते हा पुरवठा अनियमित झाल्याने अपेक्षेप्रमाणे कारखाना चालत नाही. गेल्या ऑगस्टपासून सामान्य जनतेला या दुधाची विक्री थांबवावी लागली असून सध्या फक्त हॉस्पिटल्सनाच फक्त मागणी पुरवली जाते. कारखान्याचे प्रमुख डॉ. कोठारी यांनी साखर-पुरवठ्याबाबतची तक्रार मुख्यमंत्र्यांपर्यंत नोंदवली असून लवकरच सध्याचा साखर अभावाचा प्रश्न न सुटल्यास हा एकमेव कारखाना गुजरात वा तामिळनाडू या भागात त्यांच्या निमंत्रणानुसार नाईलाजाने हलवावा लागेल असे दिसून येते.

**यमो ८१** हे मुंबईतील प्रचंड यांत्रिकी प्रदर्शन ३० देशातील १६०० प्रदर्शकांच्या आधुनिक यंत्रसामग्रीचे दर्शन अत्याधुनिक तंत्रज्ञान घडवित असून त्यास ३० देशातील सुमारे ३ लाख यांत्रिकी विश्वातील अभ्यागत भेट देणार आहेत.

**धुळ्यात औद्योगिक वसाहत** : ललिंग परिसरात जमीन संपादन करण्याच्या कामास सुरुवात झाली असून ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादन केली जाईल त्यांना दर एकरी १० हजार रुपये देण्यात येणार आहेत आणि त्यांच्या पुनर्वसनास शासकीय मदतही देण्यात येणार आहे.

**ओगले कांच कारखाना** १९८० साली बंद पडलेला हा कारखाना सुरु होऊन १६०० कामगार कामावर रुजू झाले आहेत.

**एच.एम.टी.चे डेअरी-यंत्रउत्पादन** : सध्या जी यंत्रसामग्री परदेशातून आयात करावी लागते ती या कंपनीमार्फत देशात बनू लागल्याने परकीय चलनात बचत होईल.

**गोल्डन टोबॅकोचा नवा उद्योग** : या सिगारेट कंपनीने कागदनिर्मितीसारख्या नव्या उद्योगात पदार्पण करायचे ठरविले असून येत्या दोन वर्षांत गुजरातेत 'रॅपिंग व पॅकेजिंग पेपर युनिट' उभे राहिल असे जाहिर करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी ५.६ कोटी खर्च होणार असून सालिना उत्पादनक्षमता ७००० टनाच्या घरांत असेल.

**चर्मोद्योग केंद्र** : चर्मकारांच्या व्यवसायासाठी आवश्यक कच्चा माल व उपकरणे उपलब्ध व्हावी व उत्पादित मालाची खरेदी व्हावी यादृष्टीने रायगड जिल्ह्यातील माणगाव परिसरात १० लाख रु. खर्चून सुमारे २५ एकर क्षेत्रांत चर्मोद्योग केंद्र स्थापण्याचे ठरविण्यात आले आहे.

**अखिल भारतीय मसाला पीक विकास** मंडळाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे काळ्या मिरीच्या पिकास योग्य असल्याची शिफारस केली आहे.

**दिघी बंदर** : श्रीवर्धन तालुक्यातील हे बंदर मोठे बंदर म्हणून विकसित करण्याची योजना शासकीय समितीच्या बैठकीत आखण्यात आली आहे. मुंबईत वाढणारी गर्दी कमी करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**प्रदूषणनाशासाठी** : ठाणे येथील किरण स्पिनींग मिल्समध्ये नव्याने उभारलेली पर्यावरण यंत्रणा कार्यक्षम झाली. प्रदूषणावर उपाय शोधण्यासाठी ही यंत्रणा उभारली असून एकूण खर्च २-५ लाखपर्यंत येईल.

**चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र** योजनेच्या तिसऱ्या टप्प्यास मान्यता मिळाली असून अंदाजे २ अब्ज ६० कोटी ८५ लक्ष रुपयाच्या या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे.

**कांडला खुला-व्यापारक्षेत्र** : यावर्षी ४० कोटीचे निर्यातीचे लक्ष्य ठरविलेल्या या व्यापारक्षेत्राने गेल्या दोन महिन्यात ७.१३ कोटींची निर्यात करून उद्दीष्ट साध्य करण्याकडे चांगलाच पल्ला गाठला आहे.

# साहित्य संगीत-कला

मराठी चित्रपट महामंडळाला दीड लाखाचे उत्पन्न झाले आहे अशी घोषणा अध्यक्ष श्री. सुधीर फडके यांनी केली आहे. पुणे, औरंगाबाद आणि नासिक येथे आयोजित केलेल्या कलाकार रजनीमधून त्याचप्रमाणे 'चित्रशारदा' पुरवणीतील जाहिरातीतून हे उत्पन्न मिळाले आहे. महामंडळाचे नाव बदलून 'अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ' असे नाव ठेवण्यात आले. दुय्यम कलाकार व चित्रपट निर्मात्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी श्री. विश्वास सरपोतदार यांच्या नियंत्रणाखाली एक उपसमिती नेमण्यात आली.

**ठाण्यात संगीत शिक्षण-श्रवण अकादमी:** ठाण्याचे रसिक कै. रा. वि. जोशी यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित केलेल्या श्री. सत्यशील देशपांडे यांच्या गायनप्रसंगी प्रा. पानसे यांनी संगीत शिक्षण-श्रवण अकादमी स्थापण्याचा संकल्प सोडला व रसिकांनी उत्स्फूर्तपणे देणग्याहि दिल्या आहेत.

**नवी कॅसेट 'प्यारा समाँ':** दोन मराठी कलावंतांनी, नीला रविंद्र (भिडे) आणि अशोक पत्की यांनी हिंदी चित्रपटसंगीताची बहारदार कॅसेट 'मोबॅक' कंपनीतर्फे प्रकाशित केली आहे. नीला रवींद्र, कृष्णा कल्ले, विनय मांडके, रानी गिडवानी, अविनाश प्रभावळकर व अशोक पत्की यांनी गायिलेली गीते या कॅसेटवर आहेत.

**'नाट्यदर्पण रजनी':** यंदा सातव्या वर्षीच्या या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कथाकथनकार व. पु. काळे यांचा मनोरंजक 'साप्ताहिकी' नावाचा कार्यक्रम ६०-७० कलावन्त सादर करणार आहेत. पं. जीतेंद्र अभिषेकी व पुरुषोत्तम दारव्हेकर 'नाट्य-संगीतातील चमत्कार' हा अभिनव कार्यक्रम सादर करणार असून त्यात पं. अभिषेकी, राम मराठे, बकुल पंडित, आशा खाडिलकर, नीलाक्षी जुवेकर, ह्या डोंगरे आदि कलाकार भाग घेतील. चारवेरीज बालकलाकार आनंद भाटे यांच्या गायनाचा, मधु कांबीकर यांच्या नृत्याचा कार्यक्रम उस्फूर्त नाट्याविष्कार हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम, व यंदाची विजेती एकांकिका 'फाशीचं नाटक' याचा प्रयोग सादर करण्यात येईल.

**तमाशा शिबीर:** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचलनालयातर्फे परभणी येथे १७ जुलै ते २५ जुलै रोजी सातवे तमाशा शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

**नाट्यशिक्षणवर्ग:** प्रतिवर्षाप्रमाणे यंदाहि 'नाट्य-शिक्षणकेंद्राचा तीन महिने मुदतीचा नाट्य-शिक्षणविषयक अभ्यासक्रम कीर्ती महाविद्यालय, दादर येथे ५ ऑगस्ट ते ५ नोव्हेंबर या काळात घेण्यात येणार आहे. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ५ नोव्हेंबर (रंगभूमीदिन) रोजी नाट्यप्रयोग करण्यात येईल. अभ्यासवर्गाचे संचालन आणि अध्यापन डॉ. कृ. रा. सावंत करणार आहेत.

**साहित्य-शिबिर:** साहित्यमंडळाने नवलेखकांसाठी निसर्गरम्यस्थळी शासनाच्या खर्चाने शिबिरे आयोजित करण्याची योजना आखली असून पहिले शिबिर भंडारा जिल्ह्यात नवेगाव बांध या स्थळी ४ ते ११ जुलैला घेण्यात आले.

**खास प्रदर्शन:** नाट्यशताब्दि वर्षानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचलनालयातर्फे कावसजी जहांगीर हॉलमध्ये मराठी संगीत रंगभूमीविषयक एक खास प्रदर्शन भरविण्यात आले होते.

**ग्रंथप्रकाशन:** १) धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांचे चरित्र भाग २रा, लेखिका श्री. वीणा बाळशास्त्री हरदास. २) विज्ञानकुतूहल शमविणारे 'कुतूहल: २ (१२-१६ वर्षांच्या वयोगटाकरता) संपादक: डॉ. श्री. गो. लागू (३) 'हिंदुत्व' व (४) 'हिंदु संघटन' लेखक: मा. गो. वैद्य. (५) 'शवासनातून आत्मविकास' डॉ. संप्रसाद विनोद.

**मानसन्मान, पुरस्कार:**

- गानहिरा श्रीमती हिराबाई बडोदेकर ह्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त डॉ. वसंतराव देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे पं. मन्सूर यांना कालिदास पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचाहि सत्कार केला.
- शासनातर्फे देण्यात आलेल्या आर्थिक मदतीचे चेक ज्येष्ठ कलावन्त श्रीमती इंदिरा चिटणीस, श्रीमती सरस्वती राणे, विवेक, मधु आपटे यांना पुण्यात

आणि श्री. जोगळेकर, भाऊराव दातार, शाहीर खाडि-लकर, श्रीमती अमीना बेगम, श्रीमती शैलजा खालोलकर, श्रीमती राधा मालवणकर यांना मुंबई-त सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. जयेन्द्रराव टिळक यांनी सुपूर्द केले.

• मुंबई दूरदर्शनचे मराठी नाट्यनिर्माते विनायक चासकर यांची बर्लिन दूरदर्शन केंद्राकडून दीड महिन्याच्या रंगीत दूरदर्शनप्रशिक्षणासाठी निवड झाली असून ३० जूनला ते बर्लिनला रवाना झाले.

• मराठी रंगभूमीची गेली ६० वर्षे सेवा करणारे ज्येष्ठ कलावंत श्री. बाबा वैशंपायन यांना सत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येईल.

• 'नाट्यदर्पण' च्या उत्कृष्ट एकांकिकेचे मानचिन्ह श्री. सतीश नाईक यांना 'कार्याचे नाटक' या एकांकिकेसाठी प्रदान करण्यात आले.

• सर्वोत्कृष्ट बालकलाकाराला देण्यात येणाऱ्या कै. म. वि. राजे स्मृती पारितोषिक 'देणाऱ्याचे हात हजार' या नाटकात काम करणाऱ्या बेबी पल्लवीला देण्यात आले आहे.

• अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेतर्फे झालेल्या कल्याणला मेळाव्यात यंदाचे उत्कृष्ट गायनाचे पारितोषिक मुकुंद उपासनी, सौ. जयश्री शहाणे आणि बालकलाकार आनंद भाटे यांना देण्यात आले.

• नाट्यपरिषदेचे यंदाचे सर्वोत्कृष्ट पारितोषिकाचे मानकरी : श्रीमती कुसुम देशपांडे, छोटा गंधर्व, डॉ. एस. पी. भाडारकर, श्री. विद्याधर गोखले.

• साहित्यक्षेत्रातील गौरवास्पद कामगिरीबद्दल देण्यात येणाऱ्या फेलोशिप आणि मानपत्राचे यंदाचे मानकरी : कुसुमाग्रज आणि कवी नारायण सुर्वे.

• डॉ. प्र. न. जोशी यांच्या 'सर्वज्ञ' कादंबरीस अमरावतीकडील महानुभाव ग्रंथोत्तेजक पुरस्कार (१९८०) देण्यात आला.

• रोटरी क्लब ऑफ कल्याणतर्फे आयोजित केलेल्या कै. सुरेशबाबू परदेशी स्मृति शास्त्रीय गायन स्पर्धेत सौ. प्रतिभा गोरे सर्वप्रथम, द्वितीय क्रमांक श्री. पद्माकर देशपांडे, तृतीय क्रमांक सौ. प्रियंवदा जवाडे व उत्तेजनार्थ कु. आशा पारसनीस यांप्रमाणे पारितोषिके मिळाली.


मराठी, गुजराती, पंजाबी, बंगाली
दक्षिणभारतीय ध्वनिमुद्रिका,
पं. भीमसेन जोशी, मालिनी राजूरकर
पं. वसंतराव देशपांडे, पद्मा तळवलकर
एन्. राजम यांच्या मैफिली.
यासाठी लिहा: SAMITA RANADE.
13003 TRINA DRIVE.
PHILA., PA 19116
PHONE: (215) 969-1232



तुमच्या प्रवासाच्या सर्व सोयीसाठी
संपर्क साधा -
सतीश विटकर
मनाली वर्ल्ड ट्रॅव्हलचे प्रतिनिधि
पत्ता:
7241 SPRINGSIDE AVENUE,
DOWNERS GROVE, ILL. 60515
TEL. (312)-964-3388
(312)-964-3389
NEW YORK (212) - 523-7121



संगीत विशारद, प्रा. सौ. प्रभा डांगे
१० जुलै ते १४ ऑगस्टपर्यंत अमेरिकेच्या दौऱ्यावर.
भारतीय आकाशवाणी, आणि दूरदर्शनवर
क्लासिकल संगीत, नाट्यसंगीत, भावगीते
यांचे त्यांनी कार्यक्रम केलेले आहेत.
संगीत कार्यक्रमासाठी लिहा:
PRAKASH DESHMUKH
1405 OCC. AVE 7,
WATERTOWN, WIS. 53094

# शैक्षणिक

**प्रवेशकेंद्रे** : राज्यशासनाच्या शिक्षणविभागातर्फे १९८१-८२ च्या शैक्षणिक वर्षासाठी बृहन्मुंबईतील कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी च्या वर्गात १ जुलैपर्यंत ज्यांना प्रवेश मिळाला नसेल त्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रवेशकेंद्रे उघडण्यात आली आहेत.

**वह्यांचा काळा बाजार** : कर्नाटक आणि महाराष्ट्र येथून सवलतीच्या दरातील वह्या चोरट्या मार्गाने आणून मडगाव येथे काळ्याबाजाराने विकणाऱ्या दोन दुकानदारांना गोव्यातील विद्यार्थ्यांनी मुद्देमालासह पकडून दिले.

**प्रवेशनिर्बंध** : गोव्यातील इंजिनियरिंग, मेडिकल व फार्मसी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या परराज्यातील विद्यार्थ्यांचा त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर उपयोग होत नसल्याचे दिसून आल्यानंतर अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी व्यापक निर्बंध करण्यात आले आहेत. गोव्यातील शिक्षण अर्धवट सोडून आपल्या राज्यातील महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून २००० रुपये दंडाच्या रूपात वसूल करणे शासनाला शक्य झाले आहे.

**एस. एस. सी. चा निकाल** : महाराष्ट्रातील यंदाच्या S.S.C. चा निकाल ५४.३४ टक्के लागला असून नागपूरचा जयंत घोपडे ९४.६ टक्के गुण मिळवून सर्वप्रथम आला आहे. गुणवत्ता यादीतील ५४ विद्यार्थ्यांपैकी ३० विद्यार्थी मुंबईच्या पार्ले टिळक विद्यालयातील आहेत.

**वाडा कॉलेज** : विकास संचलित शिक्षणसंस्था वाडा येथे आदिवासींमध्ये १५ वर्षे शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. डहाणू व वाडा येथील दोन कॉलेजात अकारण स्पर्धा होईल म्हणून शासनाने वाडा कॉलेजची परवानगी जून ३० ला अचानक रद्द केली. ३ जूनला निघालेल्या आदेशानुसार शिक्षणसंस्थेने कार्यास सुरुवात केल्यानंतर थोड्याच अवधीत असा प्रकार घडल्याबद्दल शिक्षणसंस्थेने न्यायमूर्तींकडे मागणी केली त्यानुसार न्यायमूर्तींनी 'शासनाच्या पहिल्या आदेशाचे शासनाने व शिक्षणसंस्थेने पालन करावे व १९८१-८२ वर्षी कॉलेज चालू ठेवावे ' असा महत्वपूर्ण स्थगिती आदेश दिला आहे.

**विद्यार्थ्यांचा मोर्चा** : अहमदनगर येथे असलेले फार्मसी कॉलेज मुंबईला हलवू नये म्हणून कॉलेज विद्यार्थ्यांनी अहमदनगर येथे मोर्चा काढला होता. तसेच गेले काही दिवस साखळी उपोषणही चालू केले आहे.

**अकरावीत सर्वांना प्रवेश** : सर्वसाधारणपणे ५०,००० विद्यार्थी अकरावीच्या वर्गात प्रवेश घेतील अशी अपेक्षा असून त्या सर्वांना प्रवेश देण्याची हमी महाराष्ट्र शासनाने दिली आहे.

**वैद्यकीय शिक्षण पद्धतीत सुधारणा** : परदेशी जाणाऱ्या भारतीय डॉक्टरांच्या बाबत चिंता व्यक्त करून केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण परिषदेने वैद्यकीय शिक्षण पद्धतीत योग्य सुधारणांसाठी एका वैद्यकीय व आरोग्य शिक्षण आयोगाची स्थापना केली जावी व शक्यतो त्याचे वैद्यकीय विद्यापीठात परिवर्तन व्हावे अशी शिफारस केली आहे.

**साक्षरताप्रसार** : प्रौढांच्या साक्षरतेसाठी कल्याने एक उपक्रम हाती घेण्याचे गोवा शासनाने ठरविले असून शैक्षणिक प्रगतीसाठी खाजगी स्वरूपाच्या योजनांना देखील शासनाचे सहाय्य लाभेल अशी घोषणा मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांनी केली.

**विद्यार्थी कृति समिती** : मुंबई उपनगरातील महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवण्यासाठी होणारा त्रास दूर करण्यासाठी इंदिरा युवक कॉंग्रेसने 'संजय गांधी विद्यार्थी कृति समिती' नेमली आहे. वशिलेबाजीच्या गैरमार्गाचा अवलंब रोखण्यासाठी प्रसंगी मोर्चे, घेराव वगैरे कार्यक्रम हाती घेण्यात येतील.

■ औरंगाबाद मेडिकल कॉलेजच्या नव्या अधिष्ठातापदी तेथील रहिवासी डॉ. वरे यांची नियुक्ती नुकतीच करण्यात आली.

■ S.S.C. बोर्डात पहिल्या येणाऱ्या (मुलींमध्ये) विद्यार्थिनीस दिला जाणारा नाना शंकरशेट स्कॉलरशिप पुरस्कार (५०० रु.) यावर्षी कु. नंदिनी परांजपे हिला देण्यात आला.

आगामी शैक्षणिक वर्षापासून लॉ कॉलेजमध्ये १२वी नंतरच प्रवेश देण्यात येईल. जून १९८२ पासून कायद्याचा अभ्यासक्रम तीन वर्षांऐवजी चार वर्षांचा करण्यात येत आहे.

महापालिका शाळांतील ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस पालिकेकडून शिष्यवृत्ती आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

July 81.

## क्रीडा-जगत्

**करमुक्त देणग्या** : पुढील वर्षी दिल्लीत आयोजित करण्यात येणाऱ्या नवव्या आशियाई क्रीडा महोत्सवासाठी सर्वसाधारण जनतेने मंडळाला खाजगी कंपन्यांकडून किंवा वैयक्तिक स्वरूपात मिळणाऱ्या देणग्या करमुक्त करण्यात येणार आहेत.

**आशियाई क्रीडा स्पर्धा** : १९८२ साली दिल्लीत होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा लक्षात घेता शाळा, महाविद्यालये किंवा विद्यापीठांशी आपल्या खेळाडूंना स्पर्धांच्या दरम्यान जाहीर केल्याने विद्यार्थ्यांना मुक्त होईल असा आशयाचे पत्र केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी राज्यशिक्षणमंत्री व केंद्रशासित प्रदेशांच्या प्रमुखांना पाठविले आहे.

**मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा** : ४ जुलै ते ३१ जुलैच्या दरम्यान मद्रास येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेसाठी केंद्रसरकारने ५० हजार रु. दिले आहेत.

**अजिंक्यपद , विजय** :

- अहमदनगर बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या वतीने घेतलेल्या शरीरसौष्ठव स्पर्धेत मुंबईचा रमाकांत पवार पहिला आला व तो 'महाराष्ट्र श्री'चा मानकरी ठरला.
- बनसाळीवाला, दादर येथे झालेल्या राज्य कॅरम अजिंक्यपद स्पर्धेत वर्षा आकोडकर व मृणाल रणदिवे महिला दुहेरीत अजिंक्य ठरल्या.
- बॉम्बे क्रिकेट असोसिएशन तर्फे क्लब हाऊसतर्फे झालेल्या खुल्या टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरी गटात मनमित सिंग व महिला एकेरी गटात इंदू पुरी विजयी.
- प्रथम सीडेड अरुण साठे व सुरेखा दुभाषी यांनी कॅथॉलिक जिमखाना खुल्या टेबलटेनिस स्पर्धेतील अनुक्रमे पुरुष व महिला एकेरीचे अजिंक्यपद पटकाविले.

## महाराष्ट्र मंडळातून फेरफटका —

**महाराष्ट्र मंडळ , डेट्रॉइट** : या मंडळाने धार्मिक शिक्षणमाला या व्याख्यानमालेला सुरुवात केली असून इंग्रजीतून मुलांसाठी धर्मविषयक व्याख्याने देण्याचा हा उपक्रम आहे. त्यांचे अनुभव आपणास कळविल्यास मार्गदर्शक ठरावेत.

सध्या सर्वत्र सहलींचे कार्यक्रम आखलेले दिसतात. त्याचप्रमाणे गणेशोत्सवासाठी कार्यक्रम आखण्यात सर्व कार्यकारिण्या मग्न असाव्यात.

सर्व महाराष्ट्र मंडळांना एक विनंति :

आपल्या भागातील हालचालींचे वृत्त आमच्यापर्यंत पोचविल्यास सर्वांनाच त्याची माहिती करून देता येईल. आपल्या मंडळासाठी वृत्तमहाराष्ट्राचे अंक हवे असल्यास कळवावे. सर्वांना त्याबद्दल ओळख होईल.

खालील व्यक्तींनी देणगी दिल्याबद्दल आभार!

श्री. सुभाष कुरणे , ब्लूमिंग्टन, इलिनॉय.<br>
श्री. अरविंद वाडेकर , कोरम , न्यूयॉर्क<br>
श्री. सुभाष देवधर , स्टिव्हन्सपॉईंट , विस्कॉन्सिन.<br>
श्री. बी. एन. दिक्षित , पीटर्सबर्ग , पेनसिल्व्हेनिया.<br>
श्री. दिलीप वागल , ॲव्हेन , मॅसॅच्युसेट्स<br>
श्री. मोहन रानडे , फिलाडेल्फिया , पेन.<br>
डॉ. नीलकंठ रानडे , मेडिसन हाइट्स , मिशिगन<br>
श्री. सुरेंद्र सुरवटनकर , साऊथफिल्ड , मिशिगन<br>
श्री. शैलेंद्र भेडे , मेटरी , लुईझियाना<br>
श्री. मधनदास कोडे , फेअरलॉन , वॉशिंग्टन<br>
डॉ. लक्ष्मी चतुर्वेदी , ॲक्रन , ओहायो<br>
श्री. पी. जी. जोशी , सम्टर , सा. कॅरोलिना.<br>
श्री. पी. जी. देशपांडे , ॲक्रन , ओहायो<br>
श्री. प्रकाश टोके , बोलिंगब्रुक , इलिनॉय<br>
श्री. मोहन खोडेकर , सियाटल , वॉशिंग्टन.

FOR LOWEST FARES TO INDIA & ALL YOUR TRAVEL NEEDS
PLEASE CALL : BALWANT NEVASKAR, PH.D. PRESIDENT:

TRAVELEX INTERNATIONAL
2209 NORTH 30TH STREET
TACOMA, WASHINGTON 98403

TACOMA (206)627-5070
SEATTLE(206)682-1666

# PROTECT YOURSELF.

## SAVE NOW...FLY LATER.

Economic conditions being what they are, Air-India is reluctantly obliged to raise its First Class, Economy and promotional fares to India, effective August 1, 1981.

You can however protect yourself and save money if you act promptly.

It's simple. Book your flight and buy your ticket before July 31, 1981. You can save between 5% and 15%, depending on the type of fare purchased. Your booking cannot be changed without paying the higher fare.

For further details, contact your travel agent or call Air-India.

AIR-INDIA

WE'RE YOUR AIRLINE.

[illegible]
[illegible]